**विषय क्रमांक ३: शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) (२) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्रमाणित केलेले अहवाल प्राधिकरणास सादर केलेले नाहीत, त्यामुळे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या संदर्भात संबंधीत महाविद्यालयांनी प्राधिकरणास प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव उक्त अधिनियमातील तरतूदींनुसार दिनांक २५/०३/२०२२ रोजी पर्यंत सादर करण्याबाबत कला संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावर निर्देश देण्याबाबत कार्यवाही करावी. महाविद्यालयांचे परिपूर्ण प्रस्ताव प्राधिकरणास सादर झाल्यानंतर यासंदर्भात पुढील निर्णय घेण्यात येईल

**विषय क्रमांक ४ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारींबाबंत.**

आणि

(ख) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील उच्च शिक्षण विभागाअंतर्गत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारींबाबंत.**

उक्त नमूद प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

(ग) श्री. वामोरकर यांचे पाल्य कु. अथर्व वामोरकर यांच्या प्रवेश रद्द केल्याने शुल्क परतावाबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता श्री. विवेक वामोरकर यांचे पाल्य श्री. अथर्व विवेक वामोरकर यांना थडोमल सहानी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रवेश रद्द करुन इन्सिटट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, मुंबई या संस्थेत प्रवेश घेतला आहे. थडोमल सहानी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई येथील प्रवेश रद्द केल्यानंतर शिक्षण शुल्क परतावा मिळण्याची प्राधिकरणास विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राचार्य, थडोमल सहानी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांनी रु. १,०००/- प्रक्रिया शुल्क कपात करुन उर्वरित संपूर्ण शुल्काची रक्कम श्री. अथर्व विवेक वामोरकर यांना ०७ दिवसात परतावा करण्याचे निर्देश प्राधिकरण देत आहे. तसेच संबंधीत महाविद्यालयांनी केलेली कार्यवाही प्राधिकरणास त्वरीत सादर करावी.



१०|३|२२

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(घ) जगंदबा एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री आसाराबाई दराडे, नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.

जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री आसराबाई दराडे होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, नाशिक येथील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित एकुण ३१ प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी खालील प्रमाणे उपसमिती गठित करण्याचे निर्देश देण्यात आले,-

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. के.डी. चव्हाण,<br>सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा<br>कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | .... अध्यक्ष |
| २) | संचालक,<br>आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई | .... सदस्य |
| ३) | श्री. सिदधेश बी. नर,<br>परिक्षा समन्वयक | .... संयोजक |

उक्त गठित उपसमितीने खालील बाबींची तपासणी करुन अहवाल ०१ महिन्याच्या आत प्राधिकरणास सादर करील,-

- संबंधीत विद्यार्थ्यांचा आवश्यक सवर् कागदपत्रे तपासणी अहवाल.
- संबंधीत विद्यार्थ्यांस विद्यापीठामार्फत आयोजित परीक्षेस बसण्यास परवानगी दिली असल्यास, विद्यापीठाने परवानगी कधी दिली? यांची संपूर्ण तपासणी माहिती अहवाल.
- सदर महाविद्यालयामार्फत व विद्यार्थ्यांमार्फत मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असल्यास संबंधीत सर्व याचिका संदर्भात अहवाल.

प्रस्तूत प्रकरणी उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरण स्तरावर पुढील निर्णय घेण्यात येईल.

(ङ) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्राधिकरण स्तरावर १% निवडक पध्दतीने तपासणी/छाननी करण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्राधिकरण स्तरावर १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्याबाबत मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या आदेशाने निर्देश दिलेले आहेत, त्यास कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

(च) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सुनावणी झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा/पात्रता अर्ज स्वीकारण्याबाबत संबंधीत विद्यापीठांना कळविण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी पुनर्विलोकन याचिका प्राप्त झाल्या आहेत, अशा पुनर्विलोकन याचिकां प्रकरणी सुनावणी



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य
१०/३

झालेल्या व सुनावणी न झालेल्या, अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा/पात्रता अर्ज स्वीकारण्याबाबत संबंधीत विद्यापीठांना कळविण्याबाबत मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या आदेशाने निर्देश दिले आहेत, त्यास कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

(छ) विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. (न्यायालयीन याचिका क्र.१९८/२०२२).

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी व दव्युत्तर आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ, नागपुर येथील याचिका क्रमांक १९८/२०२२ मधील दिनांक २३/०२/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेश प्राप्त झाले आहेत. सदर प्रवेश प्रकरणी संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी तपासणी करुन त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणास १५ दिवसांच्या आत प्राधिकरणास सादर करावा. प्रस्तूत प्रकरणी संचालनालयाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरण स्तरावर पुढील निर्णय घेण्यात येईल.

प्राधिकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून संबंधीत विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या आगामी परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येत आहे.

(ज) दत्ता मेघे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, नागपूर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. कणक फतवानी या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत. (न्यायालयीन याचिका क्र.५५०४/२०२१).

दत्ता मेघे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. कणक फतवानी यांच्या प्रवेशास मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथील याचिका क्रमांक ५५०४/२०२१ मधील दिनांक ८/१०/२०२१ रोजीच्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 10/3/22